# अश्वत्थामा - भाग १

मोबाईलची रिंग वाजली म्हणून पाहिलं. अपेक्षेप्रमाणं रूपालीचाच फोन होता.

“हाय सागर, लंच टाईम आहे म्हणून आता फोन केलाय. वेळ आहे ना? की नंतर फोन करू?"

“बोल. काय म्हणतेयस? काय विशेष?"

“सागर, उद्या दादाचा वाढदिवस आहे. शिवाय त्यांच्या लग्नाला तीन महिने पूर्ण होतायत ती तारीखही सेमच आहे. म्हणजे दादाचा तिसावा वाढदिवस आणि लग्नाचा तीन महिन्याचा वाढदिवस. त्यातून अनायसे शनिवार आलाय.  दुसऱ्या दिवशीची ऑफिसची गडबड नाहीये.”

“बरं. मुद्द्याचं बोला बाईसाहेब. माझ्याकडून पार्टी उकळायची आहे का? तसं सांग ना. एवढी लांबण कशाला?”

“एवढं काही भाव खायला नकोय. मी दादाकडून पण पार्टी घेऊ शकते. ऐक ना. आम्ही म्हणजे मी आणि वहिनीने घरीच काही स्पेशल बनवायचं ठरवलंय. रात्री तू आमच्याकडे जेवायलाच ये. ओके?"

“खरंतर हरकत काहीच नाही. पण तू स्पेशल रेसिपी ट्राय करणार आहेस म्हणतेयस, म्हणजे जरा विचार करावा लागेल. काय करावं? यावं का नको...."

“सागर, भाव खायची गरज नाही हं. आणि टोमणे पण मारायला नकोत. उगीच काहीही काय रे? मी छान बनवते हं हल्ली. अण्णा आणि अविदादासुद्धा कौतुक करतात माझ्या स्वयंपाकाचं. बरं, ते सोड. ऐक ना, तू चार महिने ऑस्ट्रेलियाला गेला होतास ऑफिसच्या कामाला. आणि तिकडून परत आल्यापासूनही बिझीच आहेस. त्यामुळे घरच्या कुणाचीच तुझी भेट झाली नाहीये. तुला येऊन आठवडा होऊन गेला. पण सध्याच्या तुझ्या बिझी शेड्यूलमधून तू बाहेर येशील तेव्हा ना! म्हणून खरंतर रेखावहिनीनेच हा बेत ठरवलाय."

“ओह... रेखावहिनींनी ठरवला आहे का प्लॅन? मग हरकत नाही. येतो मी. एक काम कर. माझ्यातर्फे बर्डीजचा केक आणि नॅचरलचं आईक्रीम तू ऑर्डर करून ठेव. येतो उद्या. पक्का."

“यस. गुड आयडिया. मात्र लवकर ये. उद्यातरी वेळेवर निघ ऑफिसमधून. आम्ही सगळे वाट बघतोय."

“बरं. ठेऊ फोन आता? जरा बिझी आहे."

“हो! सध्या मिस्टर सागर असिस्टंन्ट व्हाईस प्रेसिडन्ट झाल्यामुळे खूप बिझी झालेत. त्यांना ऑफिसच्या कामाखेरीज इतर गोष्टींसाठी वेळ नाही. तेव्हा त्यांना फोन करून डिस्टर्ब करू नका, माहितीय मला. डोंट वरी. आय विल नॉट डिस्टर्ब यू टिल टुमॉरो नाईट. बाय!' रूपालीचा फणकारा मला फोनमधूनही जाणवला. तिच्या ह्याच फणकाऱ्यावर तर मी भाळलो होतो...

ऑफिसच्या काही अर्जंट कामानिमित्त मी एकदा बोरिवलीच्या आय.सी.आय. बँकेच्या शाखेत गेलो होतो. त्यावेळी तिथे काऊंटरच्या पलीकडे रूपालीची गाठ पडली होती. आणि प्रथमदर्शनीच मी तिच्या प्रेमात पडलो होतो.

बँकेतल्या इतर मुलींपेक्षा रूपाली वेगळी होती. साधी-सालस, पण तडफदार आणि बाणेदार. काऊंटरच्या पलिकडून तिला पहात असताना मला हे लक्षात आलं होतं.

त्यानंतर मग हळूहळू मी त्या बँकेच्या कामाच्या फेऱ्या जाणूनबुजून वाढवल्या होत्या. रूपालीशी परिचय करून घेतला. मैत्री केली. आणि तीन महिन्यांत तिला लग्नाची मागणी सुद्धा घातली. आमच्या दोघांच्या एका कॉमन मित्रामुळे-मनिषमुळे हा सर्व योग लवकर जुळवता आला.

माझ्या घरी अर्थातच मी एकुलता एक असल्यामुळे माझ्या लग्नाबद्दल आई-बाबांच्या जरा जास्तच अपेक्षा होत्या. त्यामुळे आधी मला त्यांना बरंच मनवावं लागलं होतं. पण रूपालीची आणि त्यांची भेट घालून दिल्यानंतर मात्र त्यांच्या मनांत कुठलाच किंतु राहिला नव्हता. रूपालीने तिच्या लाघवी स्वभावाने त्यांना लगेच जिंकलं होतं.

खरंतर रूपाली आणि तिच्या घरचे सुरवातीला माझ्याबद्दलच जरा साशंक होते. पण त्यांना मनीषने माझ्याबद्दल आणि आमच्या घरच्यांबद्दल सगळं पटवून दिल्यामुळे मी दोन्ही गड सहज जिंकले होते हे खरं.

रूपालीचं आणि माझं लग्न ठरलं. डिसेंबर एन्डचा मुहूर्त निघाला. सगळेच खुशीत होतो. तिच्या दादाचं लग्न एप्रिलमध्ये झालं होतं. त्यामुळे आमच्या लग्नाच्या तयारीला आईंच्या सोबत रेखावहिनीही होत्या. अजून सहा महिने अवकाश होता लग्नाला पण आईंची आणि रेखावहिनींची लगबग आतापासून सुरू झाली होती.

नुकताच आठ दिवसांपूर्वीच मी ऑस्ट्रेलियाहून आलो होतो. कंपनीने चार महिन्यांच्या ट्रेनिंगसाठी मला तिकडे पाठवलं होतं. त्यामुळे अविदादाचं लग्न मला अटेंड करता आलं नव्हतं. तिकडून आल्यापासूनही ऑफिसच्या मिटिंग्ज, प्रेझेंन्टेशन ह्यामुळे ह्या सात-आठ दिवसात रूपालीच्या घरच्यांना भेटणं मला शक्य झालं नव्हतं. आता तिच्या दादाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने जेवायलाच जायचंय म्हणजे सगळ्यांशी निवांत गप्पा होतील...

ऑफिसमध्ये आजही उशीर होणार होताच. पण उद्या लवकर निघायचंय म्हणून मी आज बरीचशी कामं हातावेगळी करत होतो.

एरवी शनिवारी मला ऑफिसला सुट्टी असते. पण कंपनीची एक नवी ब्रांच बोरीवलीला ओपन होणार आहे. त्यामुळे सध्या आम्ही काहीजण शनिवारी ऑफिसला जाऊन ते सर्व वर्कआऊट करतोय. एक पूर्ण डिपार्टमेंट नरीमन पॉईंटहून बोरीवलीला शिफ्ट करायचंय. सध्या भरपूर काम आहे. दिवस कसा संपतोय कळत नाहीये.

शनिवारी मी लवकर काम आटपायचं आणि ऑफिसमधून शक्यतो लवकर निघायचं ठरवलं होतं. रूपालीने फोनवर म्हटल्याप्रमाणे खरोखर संबंध दिवसात एकदाही फोन केला नव्हता. फक्त चार वाजण्याच्या सुमारास एक मेसेज तेवढा पाठवला होता.

`लवकर निघणार आहेस ना?' `या शूअर' मीही रिप्लाय टाकला होता.

मिटिंग सुरू होती ती संपायला पाच वाजलेच. माझ्या टेबलापाशी येऊन मी शक्यतो भराभर सर्व आटपू पहात होतो. घड्याळात पाहिलं. आज घड्याळाचे काटे फारच हळूहळू  सरकतायत की काय असं मला वाटत होतं.

“काय रे, आज सारखं घड्याळ बघतो आहेस. वहिनींना घेऊन कुठे बाहेर जायचा प्लान आहे वाटतं?” मित्राने टोकलं. लग्नाची तारीख ठरली असल्यामुळे मित्रांच्या दृष्टीने रूपाली आता ऑफिशियली त्यांची वहिनी झाली होती.

“लकी यार! चट मंगनी पट ब्याह! तू तो नसीबवाला निकला. वाह वाह रामजी! जोडी क्या बनाई...!" मित्रांनी माझी फिरकी घ्यायची संधी सोडली नाही.

एकदाचं काम संपवून आम्ही मित्र एकत्रच ऑफिसमधून बाहेर पडलो. मी चर्चगेट स्टेशनहून स्लो लोकल पकडून माहीमला उतरलो.

आज दिवसभरच पावसाची रिपरिप होती. पावसामुळे रस्ता सगळा चिकचिक झाला होता. घरी जाऊन कपडे चेंज करून, फ्रेश होऊन मी कारने कांदिवलीला रूपालीकडे जायचं  ठरवलं. मोबाइल ओला व्हायला नको म्हणून तो सॅकमध्ये पुढच्या खिशात ठेवला. कारची चावी घेऊन मी खाली आलो. पार्किंगमधून माझी गाडी काढली आणि निघालो.

पाऊस थांबणं तर सोडाच, पण आता तर त्याने अगदी तांडवच मांडलं होतं. चार महिन्यांनी रूपालीला भेटणार असल्यामुळे माझं मनही तसंच चिंब चिंब झालं होतं. आमच्या दोघांच्या भेटींच्या अनेक आठवणी मनात रुजवत मी ड्राईव्ह करत होतो.

वांद्र्याच्या फ्लायओव्हरवरून गाडी वेस्टर्न एक्सप्रेसला लागली. पावसाचा रुद्रावतार पाहून वाटलं, थोडं थांबून पावसाचा रागरंग पाहून अजून थोड्या वेळाने घरून निघायला हवं होतं. धुंवाधार पावसात अगदी पुढचं दहा फुटांवरचंही नीट दिसत नव्हतं. पण आधीच खूप उशीर झाला होता. साडेनऊ वाजत आले होते. जेवायला माझ्यासाठी सगळे वाट पहात असतील....

हायवे तसा सुनसान होता. असल्या तुफानी पावसात कोण कशाला बाहेर पडणार?

मी माझ्याही नकळत गाडीचा स्पीड थोडा वाढवला.

सांताक्रुझच्या फ्लायओव्हरवरून गाडी पार्ल्यापर्यंत पोचली आणि अचानक डाव्या बाजूच्या साईड रोडने एक स्कूटर हायवेला लागली.

मी स्पीडमध्ये होतो. राँग साईडने आलेली स्कूटर मला पटकन कळलीच नाही. माझ्या गाडीची जोरदार धडक बसून स्कूटरवाला स्कूटरवरून फेकला गेला…

माझ्या हातापायांना कापरं भरलं. पाठी-पुढे दुसरं वाहन नव्हतं. पोलिसही तिथे नव्हते. मी नेटाने गाडी तशीच पुढे नेली.

रूपालीला भेटण्याची मला घाई झाली होती.

त्या स्कूटरवाल्याला किती लागलंय, त्याला हॉस्पिटलमध्ये पोचवावं लागेल का? कोण होता तो? आता पोलिसकेस होईल का? माझ्या हातून चुकून ॲक्सिडेंट घडलाय….एक ना अनेक, नाना विचार मनांत डोकावून गेले.

मी भयंकर घाबरलो होतो. स्टिअरिंगवरचे माझे हात थरथरत होते. बंद गाडीतल्या एसीमध्येही मला घाम फुटला होता.

“देवा त्या स्कूटरवाल्याला फारसं लागलेलं नसूदे." मी मनातल्या मनांत देवाची करूणा भाकली.

एकदा वाटलं, पुढच्या सिग्नलला यू टर्न घेऊन गाडी विरुद्ध दिशेनं परत घ्यावी. त्याला कितपत लागलंय ते पहावं. जरूर असेल तर त्याला हॉस्पिटलमध्ये घेऊन जावं. निदान त्याचं नाव-पत्ता विचारून त्याच्या घरच्यांना कळवावं…

पण मी खूपच घाबरलो होतो. ह्यातलं काहीच मी केलं नाही. माझी विवेकबुद्धी कामच करत नव्हती.

मनाच्या अशा भयानक अवस्थेत मी रूपालीकडे जाऊन मोकळेपणाने कशा काय गप्पा मारणार? डिनर कसं एन्जॉय करणार? त्यापेक्षा आता माहीमला घरी परत जावं. उद्या सकाळी लवकर उठून सकाळच्या चहा-नाश्त्यालाच रूपालीकडे जावं. आज न गेल्यामुळे रूपालीकडचे सगळेच माझ्यावर रागावतील. पण नकोच. शेवटी मी ठरवलं, नाही, आज नकोच जायला.

जोगेश्वरीच्या पुढे जे.व्ही.एल.आर.च्या सिग्नलवरून यू टर्न घेऊन मी गाडी पुन्हा माहीमच्या दिशेने वळवली….

बाहेरचा पाऊस थोडा कमी झाला होता. पण माझ्या मनात मात्र रण माजलं होतं. पार्ल्याच्या त्या स्पॉटपाशी गाडी आली तेव्हा रस्त्यावर पलिकडच्या बाजूला बरीच गर्दी आणि एक पोलिस व्हॅन दिसली.

मला मनातून खूपच अपराधी वाटत होतं.

घरी गेल्यावर रूपालीला फोन करून सांगावं. पण न येण्याचं कारण काय सांगायचं? बघू, फोन केल्यावर जे सुचेल ते सांगूया. हे ॲक्सिडेंटचं मात्र नकोच सांगायला.

(क्रमश:)

**लीना माटे**

**मो. 9819534428**

**Email- leenashining@gmail.com**